महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

Rs.2/-

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ १२ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०५२ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# काटई नाका- मुंब्रा विशेष उन्नत प्रकल्पाला परवानगी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : काटई नाका ते मुंब्रा या ६.७१ किमी लांबीच्या विशेष उन्नत प्रकल्पाला किनारपट्टी क्षेत्र नियमनासंबंधीची (सीआरझेड) परवानगी मिळाली आहे. या प्रकल्पात काही भाग खारफुटीचा आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) हा प्रकल्प उभारत आहे.

नवी मुंबईसह मुंब्रा, डोंबिवली, शीळ फाटा या परिसरातील वाहनचालकांना सातत्याने वाहतूककोंडीचा सामना करावा लागतो. त्यासाठीच एमएमआरडीएकडून ऐरोली ते मुंब्रा असा विशेष मार्ग उभारण्यात येत आहे. याच मार्गाचा विस्तार म्हणून एमएमआरडीएने मुंब्रा-काटई नाका अशा उन्नत मार्गाचे नियोजन केले आहे. देसाई खाडीवरून जाणाऱ्या या मार्गाला महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाने (एमसीझेडएमए) अलीकडेच मंजुरी दिली. या प्रकल्पाची ५७० चौरस मीटर जागा सीआरझेडमधील आहे. एकूण १६ हजार २७९.९१ चौरस मीटर क्षेत्राचा त्यात समावेश आहे. त्यातील १५८.२१ चौरस मीटर हा खारफुटीचा भाग आहे.



- ६.७१ किमीचा मार्ग देसाई खाडीदेखील पार करणार
- खारफुटीचा दोन हेक्टरचा भाग टाळून खांबांची होणार उभारणी
- अंतिम मंजुरीसाठी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे शिफारस

## दीड तासांचा प्रवास 15 मिनिटांवर

या मार्गामुळे ऐरोली ते काटई नाका हा दीड तासांचा प्रवास १५ मिनिटांवर येणार आहे. त्यामुळे पुढे बदलापूर व मुरबाड (देवी अहल्यानगर) दिशेने जाणाऱ्या वाहनांनाही लाभ मिळणार आहे. तसेच यामुळे ठाणे-बेलापूर, महापे रस्ता व शीळ-कल्याण रस्त्यावरील कोंडी दूर होण्यास मदत होईल, असे निरीक्षण नोंदवत एमसीझेडएमएने या प्रकल्पाला हिरवा कंदील दिला.

## 494 खारफुटीच्या झाडांवर प्रभाव

**एकूण २.७९ हेक्टर खारफुटीतील ४९४ खारफुटीच्या झाडांवर या प्रकल्पाचा प्रभाव पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रकल्प उभारताना त्याचे खांब खारफुटीच्या भागात येणार नाहीत, याची काळजी घेण्याची सूचना एमसीझेडएमएने परवानगी देताना एमएमआरडीला दिली आहे. यानुसार या प्रकल्पाची अंतिम मंजुरीसाठी केंद्रीय पर्यावरण व वने विभागाकडे शिफारस करण्यात आली आहे.**



# उल्हासनगरातील गुन्हेगारीवर वचक

## पोलिसांचा तिसरा डोळा सक्रिय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगरः** शहरातील गुन्हेगारीवर वचक ठेवण्यासाठी आता पोलिसांचा तिसरा डोळा अर्थात सीसीटीव्ही कॅमेरे असणार आहेत. शहरात १ हजार ५९३ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या हस्ते शनिवारी उल्हासनगर पोलिस नियंत्रण कक्षासोबतच नूतनीकृत महिला तक्रार निवारण कक्ष, नवीन सीसीटीव्ही कक्ष आणि कॉन्फरन्स हॉल यांच्या उद्घाटनाचे कार्यक्रम पार पडले. यावेळी घनिष्ठ कार्यासाठी त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करून प्रशस्तिपत्रक व पुष्पगुच्छ देऊन गौरव केला.

गेल्या काही वर्षात अपघात, गुन्हे स्थळावर असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे सर्व प्रकार लोकांपर्यंत पोहोचला आहे. अपघात होत असल्यास चूक कुणाची हा अनेकदा वादाचा विषय असतो. तर गुन्हा घडल्याच्या ठिकाणी नेमका गुन्हा कसा घडला याची माहिती या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेली असते. तपासात, पुरावा म्हणून हेच चित्रण फायदेशीर ठरते. त्यामुळे हे सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे जाळे वाढवण्यासाठी पोलिस प्रशासन आग्रही होते.

याच दृष्टीने उल्हासनगरच्या परिमंडळ चारमध्ये पोलिसांनी मोठे पाऊल उचलले आहे. आता उल्हासनगर पोलिस परिमंडळ-४ मधील विविध ठिकाणी एकूण १ हजार ५९३ सीसीटीव्ही कॅमेरे स्थापित करण्यात आले आहेत. शहरातल्या विविध भागात, विविध रस्त्यांवर चौकात, वर्दळीच्या ठिकाणी हे कॅमेरे बसवण्यात आले आहे. त्यापैकी ११३ कॅमेरे थेट लाइव्ह मॉनिटरिंगसाठी जोडले गेले आहेत, ज्यामुळे शहरातील गुन्हेगारी आणि अन्य शंका उत्पन्न होणाऱ्या हालचालींवर तात्काळ लक्ष ठेवता येईल, अशी अपेक्षा पोलिसांना आहे. या यंत्रणेचे उद्घाटन नुकतेच ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या हस्ते संपन्न झाले.

पोलीस आयुक्त डुंबरे यांनी या नवीन सुविधांमुळे गुन्हे उकळण्याची गती वाढेल अशी आशा व्यक्त केली आहे. महिला अत्याचार प्रकरणांमध्ये ४८ तासांत दोषारोपपत्र दाखल करणाऱ्या १३ अधिकारी व अंमलदारांना विशेष गौरव दिला.

थोडक्यात महत्वाचे

# स्वातंत्र्य दिनासाठी राजशिष्टाचार जारी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.11 :** येत्या शुक्रवारी, दि.15 ऑगस्ट 2025 रोजी भारताचा 79 वा स्वातंत्र्य दिन देश/राज्यभर साजरा केला जाणार आहे. यानिमित्त, महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने राजशिष्टाचार शाखेमार्फत एक परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकानुसार, राज्यातील सर्व विभागीय, जिल्हा, उपविभागीय, तालुका आणि ग्रामपंचायत मुख्यालयांमध्ये ध्वजारोहण करून स्वातंत्र्यदिन साजरा केला जाईल.

राज्याचा मुख्य शासकीय कार्यक्रम मुंबईतील मंत्रालयात सकाळी 9.05 वाजता मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते ध्वजारोहण करून साजरा होईल. त्याच वेळी, पुणे येथे राज्यपाल महोदयांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाईल. त्याचवेळी राज्यभर एकाचवेळी सकाळी 9.05 वाजता विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार आणि सरपंच किंवा गाव प्रमुखांनी आपापल्या मुख्यालयांमध्ये ध्वजारोहण करतील.

इतर कोणत्याही शासकीय किंवा निमशासकीय कार्यालयांना त्यांचा स्वतःचा ध्वजारोहण समारंभ करायचा असल्यास, तो सकाळी 8.35 पूर्वी किंवा 9.35 नंतर करावा. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत आणि त्यानंतर लगेचच राज्यगीत वाजविले जाईल. ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात मुख्य शासकीय समारंभ सकाळी 9.05 वाजता आयोजित केला जाईल.



# शहापूर पोलिसांच्यावतीने अमली पदार्थ विरोधी जनजागृती रॅली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**शहापूर,ता.11 (वार्ताहर)**

तरुणाई मध्ये सद्या 'ड्रग्ज' घेणं फॅशन झाली असून त्या नादातअमली पदार्थांचे सेवन वाढले असल्याने अश्या कोणत्याही व्यसनाचे सेवन करणे आरोग्यासाठी घातक ठरु शकते व अंमली पदार्थांमुळे आरोग्यास हानी पोहचते. याबाबत जागृती करण्यासाठी शहापूर पोलीस ठाण्याच्या वतीने व गवि खाडे विद्यालयातील विध्यार्थ्यांच्या सहाय्याने शहापूर शहरात 'जागतिक अमली पदार्थ विरोधी जनजागृती'रॅलीचे 11 ऑगस्ट ला आयोजन करण्यात आले होते.यावेळी आमदार दौलत दरोडा,पोलीस निरीक्षक मुकेश ढगे, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर तळपाडे,पोलीस उपनिरीक्षक सुरेश बाविस्कर यांच्यासह तालुक्यातील मान्यवर उपस्थित होते.

किशोरवयीन मुलांमध्ये अमली पदार्थांचे व्यसन वाढत आहे. तसेच या पदार्थांची महामार्गावरील काही धाब्यावर चोरीछुपी विक्रीही होत असल्याची चर्चा आहे.कोणत्याही स्वरूपातील ड्रग्जचे सेवन शारीरिक आणि मानसिकरित्या कमकुवत बनवते व अमली पदार्थांच्या सेवनाने व्यक्ती हिंसक बनते.लोकांना अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबद्दल जागरुक करण्यासाठी तरुण मंडळी, किशोरवयीन मुलांमधील अमली पदार्थांचे व्यसन रोखण्यासाठी पोलिसांचा प्रयत्न असून त्यासाठी ह्या रॅलीचे आयोजन केले असल्याचे पोलीस निरीक्षक मुकेश ढगे यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले.

जिथे चांगलं होतं तिथे ठाकरे आणि आव्हाड विरोध करतात -आ. विश्वनाथ भोईर

# केडीएमसीच्या मांसविक्री बंदीच्या निर्णयाला आमदार विश्वनाथ भोईर यांचा पाठिंबा !





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या प्रशासनाने मांसाहारी खाद्यपदार्थांच्या विक्रीबाबत आदेश दिले आहेत. या आदेशांवर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि शिवसेनेचे आमदार आदित्य ठाकरे यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. आयुक्तांना मांसाहार खाण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आहे का, असा प्रश्नही ठाकरे यांनी विचारला. मात्र स्थानिक आमदार विश्वनाथ भोईर यांनी महापालिकेच्या या निर्णयाचे स्वागत केले असून आयुक्तांच्या निर्णयाला पाठिंबा दिला आहे. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला असून 15 ऑगस्ट रोजी केडीएमसी आयुक्तांनी चिकण मटण बंदीचा घेतलेला निर्णय योग्यच आहे अशी प्रतिक्रिया दिली आहे. आदित्य ठाकरे आणि जितेंद्र आव्हाड जिथे चांगलं होतं तिथे विरोध करत असतात असेही भोईर यावेळी म्हणाले.

> पंधरा ऑगस्टच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून, सामान्य जनतेला यामुळे फरक पडत नाही ठाकरे आणि आव्हाड जिथे चांगलं होतं तिथे विरोध करत असतात ● आमदार विश्वनाथ भोईर

# ठाणेकरांना मिळणार पार्किंग सुविधा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे शहराची लोकसंख्या २६ लाखांच्या पुढे गेली आहे. त्याचबरोबर शहरात वाहनांच्या संख्येतही वाढ झाली आहे. यातूनच गेल्या काही वर्षांपासून ठाणे महापालिका रस्ते रुंदीकरण मोहीम राबवित आहे. असे असले तरी शहरात पुरेशी पार्किंग सुविधा नाही. यामुळे पालिका प्रशासनाने पार्किंग सुविधा निर्माण करण्यास सुरुवात केली असून अशाच एका प्रस्तावास ठाणे महापालिकेच्या प्रशासकीय स्थायी समितीने मंजुरी दिल्याने ठाणेकरांना शहरातील दोन उड्डाणपुलांखाली पार्किंग सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यातून पालिकेला वर्षाकाठी लाखो रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे.

# मुरबाड तालुक्यातील ग्रामपंचायतींची पंधरा दिवसांपासून झाडाझडती

## – अहवाल गुलदस्त्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :-** ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी ग्रामपंचायतचा कारभार पारदर्शक व्हावा तसेच नागरिकांच्या विविध समस्यांचे निराकरण व्हावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून ठाणे जिल्ह्यातील ग्रामपंचायत ची २८ जुलै पासून तपासणी मोहीम सुरू केली आहे.त्यासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी,तसेच प्रत्येक पंचायत समितीचे विस्तार अधिकारी यांचे मार्फत ग्रामपंचायत ची तपासणी मोहीम सुरू करण्यात आली असून ११. ऑगस्ट ही शेवटची मुदत असताना या ग्रामपंचायतीचा तपासणी अहवाल गुलदस्त्यात ठेवण्यात आल्याने हि तपासणी मोहीम संशयाचे भोवऱ्यात सापडली आहे. मुरबाड तालुक्यातील २०६ गावातील असणाऱ्या १२५ ग्रामपंचायत मध्ये कोट्यवधी रुपयांच्या योजना राबविण्यात येत असुन धसई,टोकाकडे, म्हसा, सरळगाव,शिवळे माल्हेड,सासणे करवेळे, सायले, पोटगाव, वैशाखरे, शिरली, चासोळे, पळु, पाटगाव,



मानिवली, कुडवली देवगाव, कान्होळ या सर्वात मोठ्या असणाऱ्या ग्रामपंचायतीचे सालाबादप्रमाणे लेखा परीक्षण करण्यात आले आहे.परंतु त्या लेखा परीक्षण अहवालात सरपंच, ग्रामसेवक यांचेवर प्रत्येक वर्षी ठेवण्यात आलेल्या दोषारोपांची गेल्या दहा वर्षांत पुर्तता केलेली दिसुन येत नाही.जर या मोठ्या ग्रामपंचायतचा कारभार सतत दहा वर्षे गुलदस्त्यात ठेवण्यात आला आहे तर ग्रामीण भागातील आदिवासी वाडी वस्त्यांवर असणारे सरपंच हे अल्पशिक्षित आहेत.मात्र ग्रामसेवक त्यांचे अल्पशिक्षणाचा फायदा घेऊन ग्रामपंचायत चा कारभार किती पारदर्शक पुणे हाताळत असेल.शिवाय काही ग्रामसेवकाकडे दोन तीन ग्रामपंचायत चा कारभार असल्याने तो ग्रामसेवक महिन्यातुन एखाद दिवस ग्रामपंचायत मध्ये हजेरी लावतात.शिवाय या ग्रामसेवकाने आज पर्यंत किती रजा उपभोगल्या यांचा देखील लेखाजोखा पंचायत समिती कडे उपलब्ध नसल्याने या ग्रामसेवकावर नियंत्रण ठेवणार कोण हा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

> ज्या ग्रामपंचायत मध्ये गैरव्यवहार आढळून येईल त्या ग्रामसेवकावर कारवाई केली जाईल.परंतु चौकशी अहवाल अजुन पंचायत समितकडे प्राप्त झाला नाही
> - लता गायकवाड, गटविकास अधिकारी पंचायत समिती मुरबाड












# कल्याण- शीळ रस्त्यावर मेट्रोच्या कामासाठी वीस दिवस वाहतूक बदल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण शीळ रस्त्यावर कल्याण ते तळोजा मेट्रो मार्गाची कामे सुरू आहेत. या रस्त्याच्या मध्यभागी आधार खांब उभी करण्याची कामे पूर्ण झाली आहेत. आता या काँक्रीट खांबांवर तुळया (गर्डर) ठेवण्याची कामे मेट्रोच्या ठेकेदार कंपनीला करायची आहेत. ही कामे करताना कोणताही अडथळा नको आणि दुर्घटना टाळण्यासाठी वाहतूक विभागाने सोमवारपासून (ता.११) ते रविवार (ता. ३१ ऑगस्ट) या वीस दिवसांच्या कालावधीत शिळफाटा रस्त्यावर रात्री पावणे बारा ते पहाटे पाच वाजेपर्यंत वाहतूक बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.

वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी कल्याण शीळ रस्त्यावरील वाहतूक बदलाची अधिसूचना काढली आहे. रात्रीच्या वेळेत वाहनांची संख्या कमी असते. त्यामुळे या वेळेत ही तुळया ठेवण्याची कामे केली जाणार आहेत.

**या तीन टप्प्यातील मेट्रो मार्गाच्या आधार खांबांवर तुळ्या ठेवण्याची कामे येत्या वीस दिवसात टप्प्याने केली जाणार आहेत. त्यामुळे हा वाहतूक बदल करण्यात आला आहे, असे उपायुक्त शिरसाट यांनी सांगितले. ११ ऑगस्ट ते २० ऑगस्ट दरम्यान मानपाडा चौक ते सोनारपाडा चौक दरम्यान तुळ्या ठेवण्याची कामे केली जाणार आहेत. २१ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट कालावधीत सुयोग हॉटेल रिजन्सी अनंतम ते व्यंकटेश पेट्रोल दरम्यान तुळ्या ठेवण्याची कामे ठेकेदार कंपनीकडून केली जाणार आहेत.**

## गीतासार

### अध्याय १८

### मोक्षसंन्यासयोगः

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥१८-४३॥

शौर्य, तेज, धैर्य, चातुर्य, युद्धातून पलायन न करणे, दान देणे आणि स्वामिभाव ही सर्वच्या सर्व क्षत्रियांची स्वाभाविक कर्मे आहेत. ॥१८-४३॥

कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् । परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥१८-४४॥

शेती, गोपालन आणि क्रय-विक्रयरूप सत्य व्यवहार ही वैश्याची स्वाभाविक कर्मे आहेत. तसेच सर्व वर्णांची सेवा करणे हे शूद्राचेही स्वाभाविक कर्म आहे. ॥१८-४४॥

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः । स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु ॥१८-४५॥

आपापल्या स्वाभाविक कर्मात तत्पर असलेल्या मनुष्यास भगवत्प्राप्तिरूप परम सिद्धीचा लाभ होतो. आपल्या स्वाभाविक कर्मात रत असलेला मनुष्य ज्या रीतीने कर्म करून परमसिद्धीला प्राप्त होतो, ती रीत तू ऐक. ॥१८-४५॥

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् । स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ॥१८-४६॥

ज्या परमेश्वरापासून सर्व प्राण्यांची उत्पत्ती झाली आहे आणि ज्याने हे सर्व जग व्यापले आहे, त्या परमेश्वराची आपल्या स्वाभाविक कर्मांनी पूजा करून मनुष्य परमसिद्धी मिळवितो. ॥१८-४६॥

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् । स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥१८-४७॥

उत्तम प्रकारे आचरिलेल्या दुसऱ्याच्या धर्मापेक्षा वैगुण्य असलेलाही आपला धर्म श्रेष्ठ आहे. कारण स्वभावाने नेमून दिलेले स्वधर्मरूप कर्म करणाऱ्या माणसाला पाप लागत नाही. ॥१८-४७॥

## भिवंडी सार्वजनिक बांधकाम विभागाचा

# पडघा खडवली रस्ता खड्डयात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




पडघा : भिवंडी, कल्याण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या मध्य रेल्वेच्या खडवली स्टेशनकडे जाणाऱ्या पडघा, खडवली रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडल्याने वाहनचालक त्रस्त आहेत.

पडघा व परिसरातील शेकडो चाकरमानी, रोजंदारी कामगार, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, व्यावसायिक मध्य रेल्वेच्या खडवली स्टेशनवरून मुंबई, उपनगर, आसनगाव, शहापुर, कसारा, येथे दररोज जात असतात तसेच पडघा खडवली रस्त्यालगत असलेल्या गावामधील व याच रस्त्याचा वापर करून टिटवाळा, गोवेली, बदलापूर, मुरबाड कर्जत जाण्यासाठी नागरीक जात - येत असतात त्यामुळे या रस्त्यावर दिवस रात्र वाहनांची वर्दळ असते. मात्र कल्याण सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रस्त्यावर स्वामी समर्थ मंदीराजवळ, भातसा नदीवरील पुलाजवळील वळणावर व भिवंडी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील खडवली फाटा, आन्हे पाडा ते मातोश्री वृध्दाश्रम, सोरगांव दरम्यान रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. तसेच काही ठिकाणी गतीरोधकाच्या दोन्ही बाजूला खड्डे पडल्यामुळे वाहन चालकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे तर या खड्डयामंध्ये वाहने आदळून नादुरुस्त होऊन व रात्रीच्या वेळी अपघाताची भिती व्यक्त करण्यात येत आहे तरी कल्याण व भिवंडी सार्वजनिक बांधकाम विभागाने हा रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी वाहनचालकांनी केली आहे.

# कुणबी विचारमंथन चर्चासत्रात अनिष्ट प्रथा बंद करण्याचा ठराव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




वाडा : सामाजिक रूढी शास्त्राधारित असतात. पूर्वजांनी त्यांना जाणीवपूर्वक धार्मिक आयाम दिला आहे. दारातील तुळस, लग्नविधीतील नखशिखांत लावली जाणारी हळद, उटणे, लावणी हंगामात पाट्यावर वाटून लावली जाणारी मेहंदी, ह्या औषधी गुणधर्म असलेल्या गोष्टी असल्याने, पूर्वजांचा शास्त्रोक्त दृष्टीकोन अधोरेखीत होतो. कौटुंबिक प्रथा मोजक्या जवळच्या २५ ते ५० माणसांसोबत साजऱ्या कराव्यात, असे डॉ. न. डी. सावंत म्हणाले, तर समाजाने अनिष्ठ रूढीपासून दूर राहावे असे श्री. विश्वनाथ पाटील यांनी सांगितले.

वाड्याच्या 'ब्लॉसम' वर कुणबी विचारमंथन आयोजित 'इष्ट-अनिष्ठ प्रथापरंपरा जनत-निर्मूलन' या विषयावरील चर्चासत्रास समाजवांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विवाहेच्छुक बारा युवकांनी हया प्रसंगी 'आम्ही अल्पखर्चातील एकदिवसीय लग्न करू' अशी शपथ घेतली, तर श्री. विलास आकरे यांनी प्रत्येक एकदिवसीय लग्नास व ऐपत नसलेल्या समाजबांधवांस विशेष सवलत देण्याचे अभिवचन दिले.

ह्या विचारमंथनातून हुंडा देणार - घेणार नाही, लग्नसमारंभावर अनावश्यक खर्च करणार नाही, यापुढे लग्न एकदिवसीय लग्नसमारंभात शास्त्रोक्त चालीरीतींवर भर दिला जाईल असे परिवर्तनात्मक ठराव एकमताने मंजूर केले. चर्चासत्रातील विचार न्यासाच्या वतीने गाव, विभाग, तालुका व जिल्हा पातळीवर स्वयंसेवक व समाजमाध्यमांव्दारे पोहचवला जाईल असे आयोजकांकडून घोषीत केले. इष्ट प्रथा, परंपरा जतन व्हाव्यात व अंधश्रद्धा कर्मकांड मुक्त असा अर्थसाक्षर समाज निर्माण व्हावा असे श्री. मोहन पाटील म्हणाले.

तसेच मृत्यूनंतर पहिला ते तिसरा व दहावा व अकरावा, ह्या पाच दिवसाच सांत्वनासाठी जायचे आहे, असे ठरविण्यात आले.

वाढदिवस, गणपती उत्सव, दहीहंडी, नवरात्र व इतर अनेक उत्सवामध्ये कसे परिवर्तन करता येईल ह्याबद्दल विचारमंथन करण्यात आले, तरुणांनी क्रिकेटच्या नादी न लागता व्यवसायिक प्रशिक्षण, शिबीर, प्रशिक्षण आत्मसात करावे असे श्री. नरेश आकरे यांनी संबोधित केले. ह्या चर्चासत्रातून अनिष्ट प्रथांचे निर्मूलन करतांना एक सशक्त, परिवर्तनशील समाजनिर्मिती व्हावी असे विचार चर्चिले गेले.

श्री. नरेश आकरे, श्री. बी. के. पाटील, श्री. सचिन पाटील, श्री. अनिल पटारे, श्री. संजय सांबरे, श्री. शिवाजी पाटील ह्यांनी समन्वयकाची भूमिका चोख पार पाडली, प्रचंड उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलेल्या ह्या सकारात्मक परिवर्तनशील सकस विचारमंथनाची सांगता राष्ट्रगीत व त्यानंतरच्या स्नेहभोजनाने झाली.

# 'आपलं मंत्रालय' विशेषांकाचे प्रकाशन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




मुंबई : शासन, समाज आणि व्यक्ती यांच्यातील सुसंवाद दृढ करण्यासाठी तसेच विचारप्रवृत्त व माहितीपूर्ण लेखन वाचकांसमोर आणण्यासाठी तयार करण्यात आलेल्या "आपलं मंत्रालय" या गृहपत्रिकेचा विशेषांक मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या हस्ते प्रकाशित झाला. या प्रकाशन सोहळ्यास सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक हेमराज बागुल तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विशेषांकात "भारतातील प्राचीन रंगांचा इतिहास", "शालेय शिक्षण विभाग व माननीय न्यायालय यांचा परस्पर संबंध" यांसारखे सखोल व ज्ञानवर्धक लेख समाविष्ट आहेत. शासनाच्या कार्याचे संवेदनशील व मानवी रूप वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा आणि सकारात्मक संवादाची नवी दिशा देण्याचा प्रयत्न या अंकातून करण्यात आला आहे."आपलं मंत्रालय" या उपक्रमातून वाचक, समाज आणि शासन यांच्यातील संवाद अधिक प्रभावी व बळकट होईल, असा विश्वास डॉ. कुलकर्णी यांनी व्यक्त केला.हा विशेषांक https://publuu.com/flip-book/945595/2075357 या लिंकवर वाचनासाठी मोफत उपलब्ध आहे.

## डोंबिवलीत शिवसेना ठाकरे गटाचे

# मंत्र्यांविरोधात अनोखे आंदोलन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



डोंबिवली : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे जिलाध्यक्ष दीपेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली डोंबिवलीत राज्य सरकारच्या मंत्र्यांविरोधात एक आगळावेगळा विरोधाचे प्रदर्शन करण्यात आले

या आंदोलनात कार्यकर्त्यांनी "पत्ते खेळणारे मंत्री" आणि "वेटरला मारणारे बॉक्सर मंत्री" अशा वेशभूषा करून प्रतीकात्मक आंदोलन केले. यावेळी जिल्हा प्रमुख दिपेश म्हात्रे यांनी असे म्हटले की या सरकारचे काही मंत्री लांचनास्पद मंत्री आहे त्यांनी महाराष्ट्राचं नाव मातीत मिळवलं अशा या सरकारच्या मंत्र्यांना मंत्र्यांचे निषेध दाखविण्याकरिता हे आंदोलन संपूर्ण महाराष्ट्रभर करण्यात येत आहे.

हे जनआंदोलन इंदिरा चौक, डोंबिवली पूर्व येथे महिला संघटना, व शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पार पडले.

# मुरबाडमध्ये अमली पदार्थ विरोधी जनजागृती रॅली

## आमदार किसन कथोरेंचा रॅलीत सहभाग!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




मुरबाड : सध्या तरूणाई मध्ये व्यसनाधिनतेचे प्रचंड वाढलेले आहे. तरूण वेगवेगळ्या प्रकारच्या व्यसनेच्या आहारी गेले आहेत. अनेकांनी जीवन संपवले आहे. कित्येकांचे संसार उध्वस्त झाले आहेत.यावर जनजागृती करण्यासाठी मुरबाड पोलीस व न्यु इंग्लिश स्कूल मुरबाड यांच्या संयुक्त विद्यमाने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

न्यू इंग्लिश स्कूल मुरबाड येथून या रॅलीला सुरुवात झाली होती. व छत्रपती शिवाजी महाराज चौकात मुरबाड पोलीस स्टेशन समोर रॅलीचे विसर्जन करण्यात आली. या रॅलीत मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे सहभागी झाले होते. त्यांनी छ.शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून रॅलीची सांगता केली. या रॅलीचे आयोजन केल्याबद्दल मुरबाड पोलीसांचे व न्यु इंग्लिश स्कूलचे कौतुक केले.यावेळी उपस्थित रॅलीला संबोधित करताना सध्या मुलांच्यात वाढत्या व्यसनाधिनते बद्दल चिंता व्यक्त करत अशा प्रकारच्या जनजागृती रॅलीतून एक चांगला संदेश समाजाला जाणार आहे. नागरिकांनीही यात सहभाग वाढण्याचे आवाहन यावेळी करत आयोजकांना धन्यवाद दिले.रॅलीत जनजागृती करण्यासाठी यावेळी विद्यार्थ्यांनी घोषणा दिल्या.


तर पोलीस निरीक्षक संदीप गिते यांनी अमली पदार्थां विरोधात मुरबाड पोलीस कडक कारवाई करणार असून शाळा, महाविद्यालये यांच्या आसपास 100 मी.वर नशायुक्त पदार्थांची विक्री करणारे टपरी धारकांचा सर्वे करून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करून बंद केल्या जातील. नागरिकांनी सुद्धा या मोहिमेत सहभाग नोंदवावा असे आवाहन करून उपस्थितांचे आभार मानले.

या रॅलीत मुरबाड न्यु इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी, मुख्याध्यापक राकेश पाडवी, नवनिर्वाचित उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल लाड,भाजपाचे नेते भरत पाटील,खरेदी विक्री संघाचे चेअरमन संतोष पवार, बाजार समिती संचालक सुरेश बांगर,मा.नगराध्यक्ष मोहन सासे, नगरसेविका मानसी देसले सुधीर तेलवणे, रिपाईचे तालुका अध्यक्ष दिनेश उघडे, मनोज देसले, अतुल देशमुख, न्यू इंग्लिश स्कूलचे शिक्षक, मुरबाड पोलीस स्टेशनचे अधिकारी, पोलीस कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अनिश पालकरची क्रीडा स्पर्धेत सुवर्ण भरारी

## राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड; अभिनंदनाचा वर्षाव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : पिनकॅक सैल्ट या मार्शल आर्ट क्रीडा प्रकाराची ९ वी राष्ट्रीय स्पर्धा लेह लदाख येथे होणाऱ्या या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात पाली येथील अनिश किरण पालकर याची ज्युनिअर संघात निवड झाली आहे. अनिश पालकरला सुवर्ण पदक मिळाले असून क्रीडा क्षेत्रात मिळवलेल्या अपूर्व यशाचे सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदननाचा वर्षाव केला जात आहे.

या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात पाली येथील अनिश किरण पालकर याची ज्युनिअर संघात निवड करण्यात आली आहे. या स्पर्धे नंतर होणाऱ्या आशिया स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड करण्यात येणार आहे. आशिया स्पर्धा ही २५ ते ३० सप्टेंबर मध्ये श्रीनगर येथील शेर ये काश्मीर इंडोअर स्टेडियम आयोजित करण्यात येणार आहे.

२०२८ च्या ऑलिम्पक स्पर्धेत प्रथमच खेळणाऱ्या या खेळात राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेला अनिश पालकर हा नागोठणे येथील रिलायन्स फाऊंडेशन शाळेत इयत्ता ९ वी मध्ये शिकत आहे. सुपर डायमंड मार्शल आर्ट चे धनंजय जगताप यांच्या प्रशिक्षणा मध्ये त्याने या खेळाची सुरुवात २०१७ पासून केली.आजवर त्याने तालुका, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर नागोठणे, मुरुड,कर्जत, नवी मुंबई,दहिसर, इस्लामपूर, सांगली, कोल्हापूर, नांदेड,लडाख,येथे झालेल्या स्पर्धा मध्ये सहभागी होत अनेक कांस्य, रौप्य,सुवर्ण पदके मिळविली आहेत. आता भारताचा आशिया स्पर्धेसाठी निवडण्यात येणाऱ्या या महत्वाच्या स्पर्धेसाठी त्याची निवड झाली असल्यामुळे त्याचे विविध क्षेत्रातील मान्यवरांचे कडून अभिनंदन होत शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## आरोग्य

### सकाळी उठणे : आजारांपासून मुक्ती

तुम्ही इंग्रजीत एक म्हण ऐकली असेलच "Early to bed, early to rise, makes a man healthy, wealthy and wise". याचा अर्थ असा की रात्री लवकर झोपणे आणि सकाळी लवकर उठणे ही व्यक्ती निरोगी, श्रीमंत आणि बुद्धीमान बनवते. म्हणूनच घरातील वडीलधारी मंडळी देखील आपल्याला सकाळी लवकर उठण्यास सांगतात.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, सकाळी लवकर उठणे ही एक चांगली सवय आहे. यामुळे तुमचा दिवस लवकर सुरू होण्यास मदत होते आणि तुमचे सर्व काम वेळेवर होते. सकाळी लवकर उठल्याने हे आजार बरे होऊ शकतात.सकाळी लवकर उठण्याचे फायदे जाणून घ्या.

हृदय निरोगी राहते : तज्ज्ञांच्या मते, जे लोक सकाळी लवकर उठून व्यायाम करतात त्यांना हृदयरोग होण्याची शक्यता कमी असते कारण लवकर उठून व्यायाम केल्याने आपल्या शरीरातील रक्ताभिसरण सुधारते आणि सुधारते , ज्यामुळे तुमचे हृदय निरोगी राहते आणि सुरळीत काम करत राहते.

वजन कमी होते : सकाळी लवकर उठल्याने तुम्हाला व्यायाम करण्यासाठी आणि निरोगी नाश्ता करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. नियमित व्यायाम आणि निरोगी अन्न वजन कमी करण्यासाठी प्रभावी आहे.

पचनसंस्था देखील सुधारते : सकाळी लवकर उठल्याने पचनसंस्था देखील चांगली राहते. तुम्हाला सांगतो की, लवकर उठल्याने शरीराचे सर्व भाग सक्रिय होतात.

# मुरबाडमध्ये ढोल-ताशाच्या गजरात आदिवासी दिन साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड : जागतिक आदिवासी गौरव दिन मोठ्या उत्साहात मुरबाड मध्ये साजरा करण्यात आला. मुरबाड शहर, सरळगाव, धसई, टोकावडे,पाटगाव, तसेच माळशेज घाट परिसरासह विविध भागांत सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

धसई येथे पारंपरिक वेशभूषा आणि ढोल-ताशांच्या गजरात भव्य रॅली काढण्यात आली. धसई सोसायटी येथून रॅलीला सुरुवात होऊन धसई चौकात पारंपरिक तारपा नाच करण्यात आला. या रॅलीत महिला, युवक आणि लहान मुलांचा उत्स्फूर्त सहभाग होता.त्यानंतर गायकर हॉल येथे विशेष सभेचे आयोजन झाले. आदिवासी नृत्य, पारंपरिक गाणी व कलागुणांचे मनमोहक सादरीकरण झाले. मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे आणि तहसीलदार अभिजित देशमुख यांनीही आदिवासी नृत्यात सहभागी होत आदिवासी बांधवांना जागतिक आदिवासी दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

मुरबाड तालुका आदिवासी संघटनेतर्फे अद्याप न सुटलेल्या अडचणी व विविध प्रश्नांबाबतचे निवेदन तहसीलदारांना यावेळी देण्यात आले. या निवेदनात शिक्षण, आरोग्य सुविधा, रोजगार संधी, वनहक्क कायद्याची अंमलबजावणी आणि पारंपरिक जमिनींचे संरक्षण या मुद्द्यांवर भर देण्यात आला.

जागतिक आदिवासी दिन हा केवळ सांस्कृतिक उत्सव नसून आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी जागरूकता निर्माण करण्याचा दिवस आहे. मुरबाड तालुक्यातील आदिवासी बांधव शेती, वनउत्पादन, हस्तकला आणि पारंपरिक ज्ञानाच्या जतनात मोलाचे योगदान देत आहेत. त्यांच्या संस्कृतीचे जतन आणि जीवनमान उंचावण्यासाठी शासन, समाज आणि स्थानिक प्रशासन यांची संयुक्त जबाबदारी आहे.

आ. किसन कथोरे यांनी तालुक्यातील सर्व आदिवासी बांधवांना शुभेच्छा देत आश्वासन दिले की, "माझा आदिवासी बांधव कोणत्याही योजनेपासून अलिप्त राहणार नाही. त्यांच्या विकासासाठी आवश्यक निधी कमी पडू देणार नाही."

यावेळी आमदार किसन कथोरे, मुरबाड तहसीलदार अभिजित देशमुख, सामाजिक कार्यकर्ते मुरबाड तालुका आदिवासी संघटनेचे अध्यक्ष व पदाधिकारी, स्थानिक ग्रामपंचायत सदस्य, विविध आदिवासी सांस्कृतिक मंडळांचे प्रमुख, महिला मंडळ असे हजारो च्या संख्येने तालुक्यातील सर्व आदिवासी बांधव उपस्थित होते.

## आजचे राशि भविष्य

**मेष**

भावा-बहिणींसोबत कोणत्याही मुद्द्यावरून वाद झाला असेल तर तोही सोडवला जाईल. कुटुंबाला वेळ दिल्याने घरातील वातावरण प्रसन्न राहील.

**वृषभ**

तुमच्या वागण्यातून लोकांमध्ये समन्वय राखाल. जवळच्या मित्राचा सल्ला तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल.कुटुंबासोबत घरी चित्रपट पाहण्याचा बेत करू.

**मिथुन**

मुलांशी काही वाद होण्याची शक्यता आहे, त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करा.ऑफिसमध्ये वरिष्ठांचे सहकार्य मिळेल आणि बिघडलेली कामेही पूर्ण होतील.

**कर्क**

लोक तुमच्या योजनेने खूप प्रभावित होतील. आजचा काळ अनुकूल आहे, परंतु तुमच्या मेहनतीचे चांगले फळ मिळण्यासाठी तुम्हाला कृतीशील राहावे लागेल.

**सिंह**

सरकारी नोकरी करणाऱ्यांना अतिरिक्त जबाबदारी मिळू शकते. अधिकाऱ्यांचाही दबाव असेल.तुम्ही एखाद्या कार्यक्रमात जाण्याचा विचार करू शकता.

**कन्या**

आरोग्याच्या दृष्टीने तुम्हाला निरोगी वाटेल. तुम्ही काही विशेष कामासाठी प्रयत्न करत असाल तर तुम्हाला यश मिळू शकते. दिवस चांगला असेल.

**तूळ**

काही नवीन कल्पनांवरही काम कराल.मुलांकडून काही विशेष आनंदाची बातमी मिळेल, घरातील सर्वजण आनंदी होतील.दिनचर्येत बदल होईल.

**वृश्चिक**

मालमत्ता खरेदी-विक्रीचे नियोजन केले असेल तर ते पूर्ण होऊ शकते. आज कुटुंबात सुसंवाद राहील. तुमची आर्थिक बाजू मजबूत राहील.

**धनु**

कुटुंबात सुरू असलेली भांडणे बाहेरील कोणाच्याही लक्षात येऊ देऊ नका. वडिलांचा आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहील.कामाच्या क्षमतेत मोठा बदल होईल.

**मकर**

तुम्हाला बालपणीचा एखादा जुना मित्र भेटेल, ज्याला भेटून तुम्हाला आनंद होईल.काही मोठे आणि वेगळे काम करण्याचा विचार करू शकता.

**कुंभ**

जोखीम घेण्यापासून मागे हटणार नाही. असे केल्याने तुम्हाला फायदा देखील होऊ शकतो. तुमचे मत कुटुंबासमोर मांडण्याची पूर्ण संधी मिळेल.

**मीन**

स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी त्यांच्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होतील. तुमचा सन्मान होईल. मुलांकडून काही चांगली बातमी मिळू शकते.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in
MEDIA

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# देशाच्या अर्थव्यवस्थेचे भवितव्य सीएंच्या हाती

## केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांचे गौरवोद्गार




### आयसीएआय कल्याण डोंबिवलीतर्फे डायरेक्ट टॅक्स कॉन्फरन्सचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आर्थिक क्षेत्रासह देशात सुरू असणाऱ्या अनेक प्रकल्पांमध्ये चार्टर्ड अकाउंटंट (सीए) आज कार्यरत असून देशाच्या अर्थव्यवस्थेचे भवितव्य त्यांच्या हातात असल्याची प्रशंसा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांनी केली. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंटसच्या कल्याण डोंबिवली शाखेतर्फे आयोजित डायरेक्ट टॅक्स विषयावरील परिषदेत ते बोलत होते. या परिषदेचे उद्घाटन केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. त्यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना त्यांनी देशातील सीएंबाबत हे गौरवोद्गार काढले.

जागतिक अर्थव्यवस्थेत आपला भारत देश आज एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला गतीने पुढे नेण्यामध्ये इथले उद्योजक आणि व्यापारी वर्ग आज काम करताना दिसत आहे. त्यांच्यासोबतच कर संकलन करण्यामागे देशातील सीए वर्गही महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. कारण देशाचे कर संकलन जितके चांगले होईल तितकीच देशाची आर्थिक प्रगतीही होणार असल्याचे मत आयुक्त अभिनव गोयल यांनी मांडत या डायरेक्ट टॅक्स परिषदेचे त्यांनी स्वागत केले. आणि कल्याणातील आयसीए भवनचा प्रश्न महापालिका प्रशासनाकडून लवकरच सोडवला जाईल आणि आपल्याला येत्या काळात हे आयसीए भवन पाहायला मिळेल अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

तर देशाच्या चांगल्या टॅक्स पॉलीसीमुळे देशभरात उद्योगस्नेही धोरण राबविण्याच्या क्रमवारीत मोठी सुधारणा होत असल्याचे मत डायरेक्ट टॅक्स कमिटीचे अध्यक्ष पियूष छाजेड आणि उपाध्यक्ष विष्णू अग्रवाल यांनी यावेळी व्यक्त केले. कल्याणातील आयसीए भवन हे आमच्या सर्वांचे स्वप्न असून हे भवन झाल्यास आमच्या हजारो सदस्यांना शैक्षणिक दृष्टीने त्याचा मोठा फायदा होईल अशी विनंती आयसीए कल्याण डोंबिवली शाखेचे अध्यक्ष राकेश अग्रवाल यांनी केली.

दरम्यान दोन दिवस चाललेल्या या परिषदेत कर क्षेत्रातील नामांकित तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन करण्यात आले. ही दोन दिवसीय परिषद यशस्वी करण्यासाठी कल्याण डोंबिवली ब्रँच अध्यक्ष सीए राकेश अग्रवाल, उपाध्यक्ष अमित मोहरे, सचिव प्रदीप मेहता, खजिनदार विपुल शहा, समिती सदस्य अनुराग गुप्ता, रोहन पाठक, ईश्वर रोहरा, गिरीश थारवानी, अमृता जोशी, माजी अध्यक्ष मदन आचवल, शेखर पटवर्धन, सौरभ मराठे, अंकित अग्रवाल, जितू रामलिखियानी, पराग प्रभुदेसाई, कौशिक गडा, मयुर जैन, वरिष्ठ सुहास आंबेकर यांनी विशेष मेहनत घेतली.

# भिवंडीत ठाकरे गटाच्या वतीने सरकारविरोधात निदर्शने

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : महाराष्ट्रात सत्तेवर असलेल्या महायुती सरकार मधील संजय शिरसाठ,योगेश कदम,माणिकराव कोकाटे यांच्यासह काही भ्रष्ट मंत्र्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पाठीशी घालूतन वाचवत आहेत.या मंत्र्यांची मंत्रिमंडळातून तात्काळ हकालपट्टी करा या मागणीसाठी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने भिवंडीत निदर्शने करूनमहायुती सरकारच्या कारभाराचा घोषणाबाजी करीत निषेध व्यक्त करण्यात आला.




भिवंडी शहरातील स्व. आनंद दिघे चौकात झालेल्या निषेध आंदोलनात शिवसेना उपनेते विश्वास थळे,ज्योती ठाकरे,सहसंपर्क प्रमुख सोन्या पाटील, भिवंडी तालुका प्रमुख करसन ठाकरे,भिवंडी जिल्हाप्रमुख मनोज गगे,शहरप्रमुख प्रसाद पाटील,महिला संघटक वैशाली मेस्त्री यांच्यासह शेकडो शिवसैनिक व पदाधिकारी सहभागी झाले होते.सर्व सामान्य नागरिकांना सुविधा देण्यास सरकार अपयशी ठरले आहे. काही मंत्री भ्रष्टाचाराचा विळख्यात अडकले असुन जनतेची लुट सुरू आहे. चेहरा भोळा , बुवाबाजी मंत्र्यांना करू ओम फट स्वाहा, बाजार उठलाय घोटाळ्यांचा खुर्चीवरून उठवा भ्रष्टाचाऱ्यांना, घरात बॅग पैशांची, सत्ता पन्नास खोक्यांची अशा घोषणां देत महिला पदाधिकाऱ्यांनी भ्रष्ट मंत्र्यांच्या बॅनरला जोडे मारून आपला संताप व्यक्त केला आहे.

यावेळी वाहतूक पोलिसांनी रस्त्यावर नियोजन न केल्याने आंदोलन ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती.

महाराष्ट्र शासन
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड**
**यांचे कार्यालय तालुका-मुरबाड जिल्हा - ठाणे**
कार्यालयाचा पत्ताः एम.आय.डी.सी. प्लॉट क्र.१४ ता. मुरबाड जि.ठाणे पिन कोडः ४२१४०१
दूरध्वनी क्र. ०२५२४-२२२१९९ ई-मेलः tahmurbad1@gmail.com

**जाहिर नोटीस**

प्रति,
१) श्री. प्रशांत बाळाराम भालेराव,
मु. सायले ता. मुरबाड, जि. ठाणे........................(अर्जदार)
विरुद्ध
२) ग्रामपंचायत सायले
जन्म मृत्यु नोंदणी विभाग,
ता. मुरबाड, जि. ठाणे............................................(सामनेवाले)

तमाम जनतेस सदर नोटोसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे:

१. उपरोक्त अर्जदार यांचे आजोबा कै. बाबू मुकुंद भालेराव, यांचा मृत्यु दिनांक ०४/०१/१९५८ रोजी राहत्या घरी मु. सायले ता. मुरबाड, जि. ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनावधानामुळे सदर जन्म/मृत्यूची नोंद निबंधक, जन्म, मृत्यु नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे दप्तरी करुन जन्म/ मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहिला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांसाठी मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे.
२. उशीरा मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज क्र. ४३३४ दाखल केला आहे.
३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणताही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे यांचे आजोबा यांचा मृत्युच्या नोंदणीचा दाखला मिळणे करीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे ११/०८/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

शिक्का

हुकुमावरुन
सही /-
(श्रीम. सुषमा अव्हाड बांगर)
निवासी नायब तहसिलदार
तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड

जा.क्र. फौजदारी/जन्म मृत्यु नोंद/कावि ६३२०/२०२५

# गाळेगाव येथे वीजवाहिनी तुटल्याने महावितरणची तारांबळ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महापारेषणाची पडघा- मोहने टॉवर लाईन गाळेगाव येथे सकाळी तुटल्याने त्याचा महावितरणला ताप बसल्याने कल्याणातील काही परिसर, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ, परिसरातील विघुत ग्राहकांना विघुत पुरवठा ठप्प झाला. विद्युत पुरवठा खंडित झाल्याचा फटका घरगुती विघुत ग्राहकासह व्यवसायिक विघुत ग्राहकांना बसला आहे.

महापारेषणच्या पडघा- मोहने हॉंयटेशन् टॉवर लाईन (100 केव्ही) गाळेगाव परिसरात सोमवारी सकाळी 10.30वा. सुमारास तुटल्याने महावितरणाच्या कल्याणातील काही परिसर, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ येथील 90 हजार विद्युत ग्राहकांचा विद्युत पुरवठा ठप्प झाल्याने कामकाजाच्या पहिल्याच दिवशी व्यवसायिक विद्युत ग्राहकापासून घरगुती विघुत ग्राहकांची वीजेवर अवलंबून असणारे कामकाज ठप्प झाले. महापारेषणने विद्युत लाईन तुटल्याने जोडण्याचे काम सुरू केले तरी सात तास होऊन देखील विघुत पुरवठा सुरळीत सुरू झाला नव्हता.

महावितरणचे कल्याण परिमंडळ मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी प्रसिद्धी माध्यामांना सांगितले की, अंबरनाथ येथील परिसरातील महावितरण सर्व्हिस सेंन्टरला महापोरषण लाईनचा कन्डक्टर ट्राप झाला असून त्याचा फटका महाविरणला बसला आहे. एक एक तास रोटेशन करीत खंडित झालेल्या परिसरातील विद्युत पुरवठा सुरू ठेवत ग्राहकांना दिलासा देण्याचे काम सुरू आहे. महापारेषण चे दुरूस्ती काम 3 वाजेपर्यंत होईल .

# जिल्हा परिषदेच्या वतीने स्वातंत्र्यदिनासोबत स्वच्छतेचाही एल्गार

## ‘हर घर तिरंगा - हर घर स्वच्छता’ अभियानाला सुरुवात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने जिल्ह्यात “हर घर तिरंगा - हर घर स्वच्छता” या विशेष उपक्रमाचा शुभारंभ जिल्ह्यात करण्यात आला आहे. ‘स्वतंत्रता का उत्सव, स्वच्छता के संग’ या टॅगलाइनखाली सांस्कृतिक मंत्रालय, पेयजल व स्वच्छता विभाग आणि राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्टपर्यंत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि प्रकल्प संचालक पंडित राठोड यांनी नागरिकांना या मोहिमेत सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले. मोहिमेत सार्वजनिक




ठिकाणांची स्वच्छता, जलकुंभ, पाणीपुरवठा सुविधा तसेच स्वच्छता घटकांचे सुशोभीकरण यावर भर दिला जाणार आहे. गावागावात विद्यार्थी व युवक स्वच्छता रॅली काढतील, तसेच घराघरात रांगोळ्या आणि सजावट करून स्वच्छतेचा संदेश दिला जाईल.

### मोहिमेची उद्दिष्टे

- लोकसहभागातून राष्ट्रीय अभिमान आणि स्वच्छतेची भावना वृद्धिंगत करणे.
- शाश्वत पाणीपुरवठा, स्वच्छता व आरोग्य यासाठी आवश्यक उपक्रम राबविणे.
- नागरिक व विद्यार्थ्यांकडून ‘स्वच्छ सुजल गाव’ प्रतिज्ञा घेणे.

### कार्यक्रमाचे वेळापत्रक

- १२ ऑगस्ट: जलजीवन मिशन अंतर्गत पाणी टाक्या, नळजोडण्या, पंप हाऊस यांची स्वच्छता व सुशोभीकरण.
- १३ ऑगस्ट : कचरा व्यवस्थापन, शौचालय देखभाल, जलसंधारण व प्लास्टिक टाळण्याबाबत जनजागृती.
- १४ ऑगस्ट : गावातील सार्वजनिक ठिकाणांची अंतिम स्वच्छता व सजावट.
- १५ ऑगस्ट: स्वच्छता चॅम्पियन आणि स्वयंसेवकांचा सत्कार.

या कालावधीत नाल्यांची स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, पाण्याची गळती शोधून थांबवणे, सार्वजनिक शौचालये, घनकचरा व प्लास्टिक व्यवस्थापन केंद्रांची स्वच्छता यासारखे उपक्रम हाती घेण्यात येतील.

# मुंबईतून भिवंडीत आलेल्या गणेशमूर्तीचे खड्ड्यांतून आगमन

## रस्ते दुरूस्त करा गणेश मंडळाची मागणी..



**गणेशोत्सव पूर्वी खराब रस्ते दुरुस्ती व रस्त्यांवरील खड्डे महापालिका प्रशासन भरून घेतील अशी अपेक्षा गणेशोत्सव मंडळ व नागरिकांना होती परंतु दरवर्षी प्रमाणे वेळकाढू पणा धोरण अवलंबिल्या प्रशासनाने या काळात रस्ता दुरूस्ती व खड्डे भरण्या कडे दुर्लक्ष केले आहे.**

**त्यामुळे नागरिकां मध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात असुन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालिकेच्या गलथान कारभाराची चौंकशी करावी अशी अपेक्षा व्यक्त करीत आहेत आहेत. दि.२० व २५ ऑंगस्ट दरम्यान भिवंडीत मुंबई, ठाणे, वसई,कल्याण, वाडा, शेलार, अनगांव येथून मोठ्या प्रमाणात गणेश मूर्ती येणार आहेत.त्यामुळे गणेशोत्सव मंडळ खराब रस्ते बाबतीत चिंता व्यक्त करीत आहेत.**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : सार्वजनिक गणेशोत्सवापूर्वी भिवंडी शहरातील अंतर्गत खराब रस्ते व खड्डेमय झालेले मुख्य रस्ते दुरुस्त करावे अशी मागणी सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळ व नागरिकांनी महापालिका आयुक्त प्रशासनाकडे केली होती मात्र पालिका प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे अखेर शहरातील खराब रस्त्यावर पडलेल्या खड्डयातून मार्ग काढत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी आपल्या आवडत्या भव्यदिव्य गणेश मुर्त्या वाजत गाजत आणून मंडपात मध्ये विराजमान केल्या महापालिकेच्या या गलथान कारभारामुळे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी व आमदार महेश चौघुले यांनी तीव्र नाराजी व्यक्त करीत पालिका अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे.

भिवंडी शहर परिसरातील अंतर्गत व मुख्य रस्ते पावसामुळे खराब झाले आहेत.गेल्या तीन महिन्यांपुर्वी रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते मात्र पहिल्या पावसातच शहरातील विविध भागातील रस्त्यावर मोठाले खड्डे पडल्याने रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे.सार्वजनिक गणेशोत्सव हा महत्त्वाचा सण लक्षात घेता महापालिका प्रशासनाने तातडीने रस्ते दुरूस्ती करण करून घेण्यात यावे असे पत्र सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळ अध्यक्ष मदन भोई व भिवंडी पोलीस दलाच्यावतीने पालिका आयुक्त प्रशासनाला देत विविध ठिकाणी बैठका घेऊन चर्चा करण्यात आली मात्र पालिका प्रशासन - बांधकाम विभाग अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे रस्त्याची अवस्था खराब व बिकट झाली आहे असे असताना आज सकाळी शहरातील सयुक्त गणेशोत्सव मंडळ, गौरीपाडा धामणकर नाका गणेशोत्सव मंडळ,कुंभार आळी मंडळ, काप आळी गणेशोत्सव मंडळ अशा काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्यावतीने वाजतगाजत मुंबई येथून आपल्या गणेश मूर्ती भिवंडीत मिरवणूक काढूत मंडपात मूर्ती विराजमान केली.खराब रस्ता व खड्डुयां मधून गणेश मूर्ती आणतात कार्येकर्ते व वाहन चालकास प्रचंड त्रास सहन करावा लागला

मंडळाच्या कार्यकर्तेनी व्यक्त केली गणेशोत्सव 15 दिवसांवर येऊन ठेपला आहे.त्यामुळे गणेशोत्सवाच्या स्वागतासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासह सर्वच जण व्यस्त झाले आहेत.काही मंडळ गणेश मूर्ती आणण्यासाठी तयारी करत आहेत.काही मंडळांनी गणेश मूर्ती आणून आज मंडपात विराजमान केले आहेत.महापालिका प्रशासनाने तातडीने गणेश मूर्ती आगमण व मिरवणूक मार्गावरील खराब झालेले रस्ते दुरुस्त करावे तसेच खड्डे भरण्याची मोहीम सुरू करावी अशी मागणी गणेशोत्सव महामंडळाचे अध्यक्ष मदन भोई, महामंडळाचे माजी अध्यक्ष शरद भसाळे,संजय काबुकर,माजी जेष्ठ नगरसेवक नारायण चौधरी, प्रशांत लाड, विशाल पाठारे,कार्याध्यक्ष गणेश मोरे व विविध गणेश मंडळाच्यावतीने करण्यात आली आहे.

# सरस्वती विद्यालयाच्या मुलांचे कराटे स्पर्धेत यश



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : शोतोकान कराटे असोसिएशन इंडिया आयोजित राष्ट्रीय स्तरीय कराटे स्पर्धा कोळी समाज हॉल ठाणे येथे नुकतीच पार पडली त्या स्पर्धेत सरस्वती विद्यालय वासिंदच्या इयत्ता अकरावी मध्ये शिकणाऱ्या लावण्या सदाशिव सातपुते हिने 16 वर्ष वयोगटात 65 की. वजनी गटात सुवर्ण पदक तर हंसिका महेश बिडवी हिने 16 वर्ष वयोगटात 45 की. वजनी गटात मध्ये सुवर्ण पदक फटकावून नेत्र दीपक यश मिळवले तसेच मयुरी गणेश ठाकरे हिने 15 वर्ष वयोगट आणि 55 की.वजन गटात मध्ये कांस्य पदक तर हर्ष दीपक गायकर यांनी 70 की वजनी गटात कांस्य पदक मिळवून शाळेचे नाव लौकिक केले आहे या सर्वांना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक (कराटे प्रशिक्षक) दौलत चव्हाण, क्रीडा प्रमुख श्री, सुनील ठाकरे यांचे व यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे विद्या विकास मंडळाचे चेअरमन विठ्ठल सातवी सेक्रेटरी रवींद्र शेलार, सर्व संचालक मंडळ व विद्यालयाच्या प्राचार्या मीना कांबळे, उपप्राचार्य सुरेश सापळे पर्यवेक्षक वासुदेव भोईर, काळूराम धनगर यांनी यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.




# ठाणे महानगरपालिकेत १७७३ पदांकरता भरती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महानगरपालिका आस्थापनेवरील गट-‘क’ व गट-‘ड’मधील रिक्त पदे सरळ सेवा प्रवेशाने भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्रशासकीय सेवा, लेखा सेवा, तांत्रिक सेवा, अग्निशमन सेवा, शिक्षण सेवा, सार्वजनिक आरोग्य सेवा, वैद्यकीय सेवा, निमवैद्यकीय सेवा आदी सेवांमधील एकूण १७७३ पदे भरली जाणार आहेत. या पदांसाठी दि. १२ ऑगस्ट, २०२५ ते दि. ०२ सप्टेंबर, २०२५ या काळात केवळ ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज करता येणार आहेत. त्याची लिंक ठाणे महापालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार या भरती प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले आहे. भरती प्रक्रियेत तुलनात्मक स्पर्धा होण्यासाठी पुरेसे उमेदवार असणे आवश्यक आहे. त्यामुळे या पदभरतीबाबतची जाहिरात प्रसारमाध्यमांमधूनही प्रकाशित करण्यात आलेली आहे.

### ऑनलाईन पद्धतीने अर्ज

गट-‘क’ व गट-‘ड’ मधील एकूण १७७३ पदांकरीता अर्ज करण्याचा कालावधी दि. १२ ऑगस्ट, २०२५ ते दि. ०२ सप्टेंबर, २०२५ असा आहे. शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणाऱ्या पात्र व इच्छूक उमेदवारांनी ठाणे महानगरपालिकेच्याwww.thanecity.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दि. ०२ सप्टेंबर, २०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करायचे आहेत.

### या पदांसाठी भरती (एकूण पदे १७७३)

सहायक परवाना निरीक्षक, लिपीक तथा टंकलेखक, लिपीक लेखा, कनिष्ठ अभियंता - १ (नागरी), कनिष्ठ अभियंता - १ (यांत्रिकी / ऑटो), कनिष्ठ अभियंता - १ (विद्युत), कनिष्ठ अभियंता – २, प्रदूषण निरीक्षक, सहायक अग्निशमन केंद्र अधिकारी, चालक-यंत्रचालक, फायरमन, वाचा उपचारतज्ज्ञ (जिद्द शाळा), मानसोपचार तज्ज्ञ (जिद्द शाळा), परिचारिका (जिद्द शाळा), विशेष शिक्षक (अस्थि व्यंग), स्वच्छता निरीक्षक, डायटिशियन, बायोमेडिकल इंजिनिअर, फिजिओथेरपिस्ट, सायकॅट्रीक कौन्सिलर, पब्लिक हेल्थ नर्स (पी.एच.एन.), वैद्यकीय समाजसेवक, क्ष-किरण तंत्रज्ञ, नर्स मिडवाईफ / परिचारीका / स्टाफ नर्स, मेमोग्राफी टेक्निशियन, एन्डोस्कोपी टेक्निशियन, ऑडी ओमेट्री टेक्निशियन, क्लिनिकल सायकोलॉजिस्ट, सी.टी. स्कॅन तंत्रज्ञ, एम. एन. तंत्रज्ञ, अल्ट्रा सोनोग्राफी / सी.टी.स्कॅन तंत्रज्ञ, ई.सी.जी. टेक्निशियन, ब्लडबँक टेक्निकल सुपरवायझर, ब्लडबँक टेक्निशियन, स्पिच थेरेपिस्ट, चाईल्ड सायकोलॉजिस्ट, प्रोस्टेटिक व ऑर्थोटिक टेक्निशियन, ई.ई.जी.टेक्निशियन, मेडिकल रेकॉर्ड ऑफिसर, फिजिसिस्ट, क्युरेटर ऑफ म्युझियम, औषधनिर्माण अधिकारी, ऑक्यूपेशनलथेरपिस्ट, पलमोनरी लॅब टेक्निशियन, ऑपथॅलमिक असिस्टंट, डेप्युटी लायब्रेरियन, लायब्ररी असिस्टंट, आर्टिस्ट, सहायक ग्रंथपाल, सहायक क्ष-किरण तंत्रज्ञ, मल्टीपर्पजवर्कर (बहुउद्देशीय कामगार), स्टॅटिस्टीशियन. ऑडिओव्हिज्युअलटेक्निशियन, सहायक प्रयोगशाळा तंत्रज्ञ, मेडिकल रेकॉर्ड किपर, प्रसाविका, ज्युनियर टेक्निशियन, लेप्रसी असिस्टंट, शस्त्रक्रिया सहायक, वॉर्ड बॉय, दवाखाना आया, लॅबोरेटरी अटेंडन्ट, पोस्टमार्टम अटेंडन्ट, मॉरच्युरी अटेंडन्ट, अटेंडन्ट, बार्बर आदी पदांसाठी भरती होणार आहे.

### तपशील महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध

ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत / तपशिल तसेच ऑनलाईन अर्ज करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळास भेट द्यावी. तसेच, संवर्गनिहाय भरावयाची पदे, पदांचा तपशिल, वेतनश्रेणी, वयोमर्यादा / वयोमर्यादा शिथिलता, निवड पध्दत, सर्वसाधारण सूचना, अटी व शर्ती, शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच आरक्षणाबाबत तरतुदी, पदनिहाय ऑनलाईन परीक्षा शुल्क, अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शक सूचना इत्यादीबाबतचा तपशिल ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर पाहता येईल.

### हेल्पलाईन क्रमांक

जाहिरातीमधील बाबींसंबंधी विचारणा करण्यासाठी ०२२-२५४१५४९९ हा हेल्पलाईन क्रमांक तो कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सोमवार ते शुक्रवार स. १०.३० ते सायं. ५.३० यावेळेत सुरू राहील. त्याचप्रमाणे, tmcrecruitment2025@gmail.com येथे इमेलही करता येईल.

त्याचबरोबर, अर्ज भरणे, परीक्षा शुल्क तसेच प्रवेशपत्र याबाबत काही तांत्रिक समस्या उद्भवल्यास महापालिकेने ०२२-६१०८७५२० हा हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून दिला आहे.

### परीक्षा शुल्क

अमागास प्रवर्गासाठी रुपये १००० एवढे प्रवेश शुल्क आहे. तर, मागासप्रवर्ग आणि अनाथ प्रवर्गासाठी ९०० रुपये एवढे परीक्षा शुल्क आहे. माजी सैनिक व दिव्यांग माजी सैनिक यांच्यासाठी शुल्क माफ आहे. अर्ज व परीक्षा शुल्क फक्त ऑनलाईन पध्दतीनेच भरणे आवश्यक आहे. उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील. परीक्षा शुल्क ना-परतावा आहे. ऑनलाईन शुल्क भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वत: भरावे लागेल. कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित / रद्द झाल्यास उमेदवारास परीक्षा शुल्क परत करण्यात येणार नाही.

ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क दि. ०२ सप्टेंबर, २०२५ पर्यंत भरता येईल. तसेच, परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेश पत्र परीक्षेच्या सात दिवसआधी उपलब्ध होईल. प्रवेश पत्रात ऑनलाईन परीक्षेचा दिनांक नमूद करण्यात येईल. ही माहिती ठाणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरही उपलब्ध करून देण्यात येईल. परीक्षेचा दिनांक, वेळ, केंद्र इत्यादी बाबी प्रवेशपत्रामध्ये नमूद केल्या जाणार आहेत. तसेच, या भरतीच्या कार्यक्रमातील संभाव्य बदलाबाबत वेळोवेळी ठाणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात येणार आहे.

# राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : दि.27 ऑगस्ट 2025 पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवाकरिता उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्याचे व त्यासाठी निवड करण्याची कार्यपद्धती पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र. पुलदे-2025 / प्र.क्र.74 (ई-1144095) / सां.का.2, दि.20 जून, 2025 या शासन निर्णयाद्वारे निश्चित केली आहे.

त्यानुसार पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णयान्वये, शासन निर्णयातील परिशिष्ट "अ" नुसार सहभागी होणाऱ्या गणेशोत्सव मंडळाने सोबत जोडलेला अर्ज भरुन mahotsav.plda@gmail.com या ई-मेलवर दि.20 जुलै 2025 पासून गणेश चतुर्थीच्या एक दिवसापूर्वी पर्यंत ऑनलाईन सादर करावे, असे जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी यांनी कळविले आहे.



# विद्यार्थी स्कूल व्हॅनला राज्य शासनाची मंजुरी

## – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

### विद्यार्थी सुरक्षित वाहतुकीसह बेरोजगारांना रोजगाराची संधी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : शालेय (स्कूल) बसचे वाढीव मासिक दर परवडत नसल्याने आपल्या मुलांच्या वाहतुकीसाठी अनाधिकृत रिक्षाचा पर्याय निवडणाऱ्या राज्यातील पालकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने धाडसी पावले टाकली आहेत. शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसह रोजगाराच्या संधीसाठी परिवहन विभागाकडून स्कूल व्हॅन परवाने वाटप खुले करण्यात येत आहेत. या बाबतची अधिसूचना निर्गमित होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री श्री. सरनाईक म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीला प्रथम प्राधान्य आहे. सुरक्षित वाहतुकीसह बेरोजगारांना रोजगाराची संधी देण्यासाठी स्कूल व्हॅनला मंजुरी देण्यात येत आहे. नव्या स्कूल व्हॅनमधून विद्यार्थी वाहतुकीचा व्यवसाय सुरू करणाऱ्यांना राज्य शासनाकडून परवाने देण्यात येतील. राज्यात अत्याधुनिक सुरक्षा सुविधांनी युक्त स्कूल व्हॅन धावती करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

परिवहन विभागाने बोलावलेल्या पालक आणि बस संघटना प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अनधिकृत वाहनांतून विद्यार्थी वाहतूक होत असल्याचा मुद्दा गाजला होता. देशात सुरक्षित विद्यार्थी वाहतुकीसाठी केंद्र सरकारने स्कूल बस नियमावलीचा (ऑटोमोटिव्ह इंडस्ट्री स्टँडर्ड्स अर्थात एआयएस-०६३) आधार घेऊन अद्ययावत मानके अर्थात स्कूल व्हॅन नियमावली (एआयएस-२०४) तयार केली आहे. चारचाकी १२+१ आसनापर्यंत विद्यार्थी वाहतूक करण्यासाठी वाहनाला शालेय (स्कूल) व्हॅनचा दर्जा देण्यात येणार आहे. सदर वाहने BS-VI या श्रेणीतील असणार आहेत. यात चालक ओळखपत्र, आपत्कालीन निर्गमन, वाहन प्रवेश, स्टोरेज रॅक यांच्या स्पष्टतेसह आसन रचना, अग्निशमन अलार्म यंत्रणा, वाहन ट्रॅकिंग अशा आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचा ही समावेश केला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी दिली.

राज्य शासनाकडून परिवहन विभागामार्फत सन २०१८ पर्यंत स्कूल व्हॅनसाठी परवाने देण्यात येत होते. मात्र स्कूल व्हॅन विद्यार्थी वाहतुकीसाठी असुरक्षित असल्याचे सांगत काहींनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. केंद्र सरकारच्या मानकानुसार राज्य शासनाने नियमावली तयार करून व्हॅन सुरू करण्याबाबतची सूचनावली प्रसिद्ध केली आहे. त्याआधारे राज्य शासनाने हे धोरणात्मक पाऊल टाकले असून या संदर्भात अधिसूचना निर्गमित होईल, असे मंत्री श्री. सरनाईक यांनी सांगितले.

स्कूल बस भाडे परवडत नसलेले पालक विद्यार्थी वाहतुकीसाठी अवैध रिक्षाचा पर्याय अवलंबतात. रिक्षाच्या तुलनेत व्हॅनमध्ये अधिक सुरक्षेची तरतूद आहे. व्हॅनचे दरवाजे बंद असतात. चार चाके असल्याने वाहन उलटण्याची शक्यता नगण्य असते. व्हॅनमध्ये शाळेची बॅग, पाण्याची बाटली आणि अन्य साहित्य ठेवण्यासाठी पुरेशी जागा असते.

**स्कूल व्हॅनमधील वैशिष्ट्ये**

- जीपीएस
- सीसीटीव्ही आणि डॅशबोर्डवर स्क्रीन
- अग्निशमन अलार्म प्रणाली
- दरवाजा उघडा राहिल्यास अलार्म यंत्रणा
- ताशी ४० वेगमर्यादेसह स्पीड गव्हर्नर
- पॅनिक बटण, आपत्कालीन दरवाजे
- स्कूल व्हॅनमध्ये लहान विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पायरी
- गाडीच्या छतावर शाळेचे नाव







बाप्पाच्या आगमनासाठी

## भिवंडीतील रस्ते झाले चकाचक

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भिवंडी मनपाकडून शहरातील डेंगे हॉस्पिटल,फेणे रोड,धनगे हॉस्पिटल ते बोबडे चौंक, धामणकर नाका या प्रमुख रस्त्यांची दुरुस्ती

प्रति गाणगापूर
प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे




जगात जोपर्यंत माणूस दुसऱ्या कुणाचा असतो, तोपर्यंत तो भगवंताचा होऊ शकत नाही. भगवंत ज्याला आपला मानतात तो मायेच्या बंधनातून सुटलाच म्हणून समजा. देवाची रोज प्रार्थना करा की, "देवा ! तू एक वेळ म्हण की, तू माझा आहेस". जेव्हा भगवंत म्हणेल की, 'तू माझा आहेस' तेव्हाच खरा ब्रह्मसंबंध जडेल. देवाने जर तुम्हाला 'आपले' म्हटले तर मग देवाला आवडतील तीच कामे करा, पण भक्तीत तृप्ती मानू नका. भक्तीत तृप्ती मानली तर माणूस परमार्थात प्रगत होऊ शकणार नाही. भक्ती अशी करा की देवाला तुमची आठवण आली पाहिजे. तुमच्या आठवणीने प्रभू बेचैन झाले पाहिजेत.

# आज कल्याण डोंबिवली महापालिकेत जनता दरबार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महापालिका क्षेत्रातील नागरिकांच्या समस्या / तक्रारी यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी दर महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी दुपारच्या सत्रात महापालिका मुख्यालयातील मा. आयुक्त महोदयांच्या दालनात जनता दरबाराचे आयोजन केले जाते. तथापि काही अपरिहार्य प्रशासकीय कारणास्तव मंगळवार दिनांक 12/08/2025 रोजी मा. आयुक्त महोदय यांचे दालनात होणारा ऑगस्ट महिन्याचा नियोजित जनता दरबार संपन्न होणार नाही याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.




# 'हरित बाप्पा फलित बाप्पा' संकल्पनेची कार्यशाळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : "हरित बाप्पा फलित बाप्पा" या संकल्पनेनुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिका, पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण विभाग आणि एज्युकेशन टुडे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक 12 ऑगस्ट 2025 रोजी शाडू माती पासून श्री गणेश मुर्ती बनविण्याच्या, शालेय विद्यार्थ्यांच्या भव्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेची नोंद इंडीया बुक ऑफ रेकॉड्स व OMG बुक ऑफ रेकॉड्स मध्ये घेतली जाणार आहे. या कार्यशाळेचे वृत्तांकन करणेसाठी कृपया उपस्थित रहावे.

स्थळ :- वै.ह.भ.प. संत सावळाराम महाराज क्रिडा संकुल, डोंबिवली (पूर्व)

वेळ :- सत्र 1 सकाळी 08:30 ते 10:30
सत्र 2 सकाळी 11:30 ते 01:30

# क्रांतिवीर धोंडू देसाई यांच्या चरित्र ग्रंथाचे प्रकाशन!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : चले जाव आंदोलनातील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक आणि शेतकरी कामगार वर्गासाठी आपले आयुष्य खर्ची घातलेले क्रांतिवीर धोंडू केशव देसाई यांच्या जीवनावर आधारित गिरीश कंटे यांनी लिहिलेल्या क्रांतिवीर धोंडू केशव देसाई या ग्रंथाचे प्रकाशन अंबरनाथ येथील रोटरी क्लब हॉल मध्ये मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

हुतात्मा भाई कोतवाल यांच्या आझाद दस्ता ह्या क्रांतिकारी चळवळीमध्ये सक्रिय सहभाग असलेले धोंडू देसाई हे क्रांती लढ्यात सहभागी होण्यापूर्वी अंबरनाथ परिसरातील शेतकरी कामगार यांच्यासाठी कार्यरत होते. भाई कोतवाल यांच्या बलिदान घटनेनंतर त्यांना ब्रिटिशांनी पकडले स्वातंत्र्यानंतर त्यांनी आपले सामाजिक कार्य सुरूच ठेवले होते.या सर्व घटनेचा परामर्श सदर ग्रंथात मांडला आहे. हा प्रकाशन सोहळा धोंडू देसाई यांचे नातू संग्राम देसाई यांच्या नियोजनाखाली आयोजित केला होता.

ह्या कार्यक्रमाचे अध्यक्ष क्रांतिवीर भगत मास्तर यांचे पुत्र शरद राघो भगत ,किसनराव तारमळे,वाळेकर मैडम,किशोर देसाई,प्रवीण देसाई,प्रमुख मार्गदर्शक प्रा.विजय कोंडीलकर,प्रकाशक हरेंद्र सोष्टे, अनुसया बाई जामघरे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक घिगे यांनी केले तर सूत्र संचालन राजकुमार कडव यांनी केले, ह्या कार्यक्रमात स्वातंत्र्य सैनिकांची तिसरी पिढी असलेले पवन कोतवाल,स्वराज पाटील,योगेश शेलार,कैलास तरे, जय हरी भोईर,सिद्धगड येथे हुतात्म्यांच्या प्रेताची राखण करणारे बाळू घिगे यांचे नातू दीपक घिगे यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाला अंबरनाथ परिसरातील इतिहास प्रेमी नागरिक आणि देसाई कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

" अंबरनाथ शहर क्रांतिवीर धोंडू देसाई यांच्या नावाने ओळखले जावे हीच अपेक्षा... गिरीश कंटे."

अंबरनाथ शहर आणि परिसरात धोंडू देसाई यांचे सामाजिक काम मोठे आहे.कंपनीतील कामगारांचा प्रश्न असो किंवा शेतकऱ्याच्या प्रश्न असो,देसाई यांनी संघर्ष करून त्यांना न्याय मिळवून दिला आहे,पुढे स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी मोलाची जबाबदारी पार पाडली आहे.अतिशय करारी बाणा आणि स्वाभिमानी वृत्ती असलेले धोंडू देसाई यांचे योगदान पाहता आज अंबरनाथ शहर म्हणजे धोंडू देसाई असे समीकरण व्हायला हवे.या या उपेक्षित राहिलेल्या वीराला शासनाने न्याय द्यावा.




# आत्मा मालिक ध्यानपीठात आत्मचिंतन सप्ताह संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : वासिंद जवळील मोहिली विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट (कोकमठाण) संचलित, आत्मा मालिक ध्यानपिठात आत्मचिंतन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

या आत्मचिंतन सप्ताहात संत सानिध्यात आत्मस्वरूप अवतारलीला पारायण, भजन पठण तसेच प्रवचन संत परमानंद महाराज यांनी प्रवचन सेवेतून साधकांना पठण, श्रवण, चिंतन व भजनाच्या माध्यमातून आत्म ज्ञान जाणून घेण्याचा संदेश दिला तर सद्गुरू माउलींच्या सगुण सान्निध्यात राहून आत्मोद्धार करावा असे आवाहन केले.

याप्रसंगी ह.भ.प.भरतजी पांगारकर महाराज, संकुलाचे कार्याध्यक्ष उमेशजी जाधव, उपाध्यक्ष प्रकाशजी भट, स्थानिक समितीचे अनंत गायकवाड , प्रवीण मोरे , व्यवस्थापक प्रा. उल्हास पाटील, ट्रस्ट विभाग राहुल जाधव, दत्तात्रेय तेलोरे, वसतिगृह विभाग बिकास रॉय, शालेय विभाग श्रीलथा नायर, आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य कैलास थोरात, आत्मा मालिक इंग्लिश मीडियम स्कूल, ज्यूनियर विद्यालय प्राचार्या पौर्णिमा उपासनी आदि संस्थेचे पदाधिकारी, भाविक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर, कार्यक्रमाची सांगता स्वरांजली ग्रूपचे राजेश सालियान, नरेंद्र गोसावी, एकनाथ गोदडे, किशोर दराडे यांच्या संगीत विभागाने अमृतवाणी व आरतीने करण्यात आली.

## जिल्हा परिषद ठाणे येथे

# 'सत्यमेव जयते फार्मर कप' मार्गदर्शन कार्यशाळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : पानी फाउंडेशनचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली 'सत्यमेव जयते फार्मर कप' या स्पर्धेबाबत माहिती व मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन जिल्हा परिषद, ठाणे येथे करण्यात आले. ही कार्यशाळा दि. ११ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी १२.०० वा. समिती सभागृह, जिल्हा परिषद कार्यालय, ठाणे येथे पार पडली.

""सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा" सुरू करण्यामागचा उद्देश म्हणजे शेतकऱ्यांनी गट शेती करून शाश्वत व नैसर्गिक शेती पद्धतींकडे वळवून त्यांचे उत्पादन व उत्पन्न वाढवणे, तसेच ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करणे हा आहे. ही स्पर्धा संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येत असून ठाणे जिल्ह्यात तो यशस्वी करण्यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी मार्गदर्शन करताना केले.

कार्यशाळेत माजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे नामदेव ननावरे, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे, कृषी विकास अधिकारी एम.एम. बाचोटिकर, विभागीय समन्वयक (पानी फाउंडेशन) विक्रम फाटक, सर्व गट विकास अधिकारी, सर्व तालुका कृषी अधिकारी, जिल्हा व तालुका अभियान व्यवस्थापक, उप अभियंता (ग्रा. पा. पु.) आणि पंचायत समित्यांतील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

डॉ. अविनाश पोळ यांनी 'सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा'चे उद्दिष्ट, सहभागाची पद्धत, लाभ आणि पारितोषिकांची माहिती सविस्तर दिली. त्यांनी शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब, नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर, उत्पादनवाढ, नफावाढ आणि जैविक शेतीच्या दिशेने होणारे सकारात्मक बदल यावर भर दिला. प्रत्येक तालुक्यातून १०० शेतकऱ्यांना ३ दिवसीय निवासी प्रशिक्षण दिले जाणार आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शेतकरी गटांना , महिलांचे शेतकरी गटाना राज्यस्तरीय आणि तालुकास्तरीय पारितोषिके प्रदान केली जाणार आहेत.

जिल्हा परिषद ठाण्याच्या वतीने या कार्यशाळेचे आयोजन यशस्वीरीत्या पार पाडण्यात आले असून, उपस्थित सर्व अधिकाऱ्यांनी स्पर्धेत अधिकाधिक शेतकरी गटांचा सहभाग सुनिश्चित करण्याचे आश्वासन दिले.

# शहापुरात आदिवासी दिन संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : आदिवासी जागतिक दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करून क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा चौक, मनोर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.


जागतिक आदिवासी दिन सर्वत्र साजरा होत असताना आदिवासी एकता मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संतोष जनाठे यांच्या अध्यक्षतेखाली येथे हा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या वेळी आदिवासी बांधवांनी विविध उपक्रम साजरे केले. तर आपली संस्कृती टिकवण्यासाठी पारंपरिक तारपा व गौरी नृत्य करण्यात आले. तसेच जागतिक मूलनिवासी दिवस व भारतीय आदिवासी समाजाची भूमिका यावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी पोलिस निरीक्षक रणवीर बयेस, प्रमुख वक्ते धरतरी ग्रामोद्योग संकुलाचे मधुकर माळकरी, सरपंच चेतन पाटील, उपसरपंच वंदनाताई चंपानेरकर, माजी सरपंच अनंत पुंजारा, दामोदर भुयाळ, ग्रामपंचायत सदस्य, लोकप्रतिनिधी, आदिवासी एकता मित्र मंडळाचे पदाधिकारी, सदस्य व आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पडघ्यात दूषित पाणीपुरवठा नागरिकांचे आरोग्य धोक्यात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील चांगले उत्पन्न असलेल्या पडघा ग्रामपंचायतीच्या नळाला गढुळ पाण्याचा पुरवठा करण्यात येत असुन गढुळ पाण्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.



पडघा ग्रामपंचायतीची स्वतःची स्वतंत्र नळपाणीपुरवठा योजना 1992 पासुन कार्यान्वित असुन जुपाडा येथील नदीतून पाण्याचा उपसा करुन तेथील जॅकवेल मध्ये पाणी घेऊन गावातील साठवण टाकीव्दारे सर्वानां नळाद्वारे पाणीपुरवठा केला जातो सदर योजनेला जलशुद्धीकरण यंत्रणा नसल्याने अनेक वेळा नागरीकांना गढुळ पाण्याचा पुरवठा होत असतो अशाच प्रकारे शनिवारी दिनदयाळ नगर येथील रहिवासी मनोज गुंजाळ यांच्या घरात असलेल्या नळाला शनिवारी अक्षरशः मातीमिश्रीत गढुळ पाणी आल्याने ही बाब लक्षात आली हे पाणी घरात कुठे आणी कसे काय वापरायचे असा प्रश्न येथील नागरिकांनी उपस्थित केला आहे. तसेच ग्रामपंचायतीची गावातील पाणी आठवण टाकी ही कमी क्षमतेची असल्याने नागरीकांना तीन दीवसांनंतर नळाद्वारे पाणीपुरवठा होत असल्याने गढुळ पाणी नाईलाजास्तव साठवण करून वापरावे लागत असल्याचे नागरीकांचे म्हणणे असुन या गढुळ पाण्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असुन नागरीकांना नळाद्वारे मिळणाऱ्या या गढुळ पाण्याबाबत ग्रामपंचायत कमीटी व प्रशासनाने ठोस उपाययोजना करावी अशी मागणी नांगरीकांनी केली आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी अ‍ॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.